**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )**

क्रमांक पोमसं/८-अ/मुफसल/का.अ./सर्वसाधा.बदल्या-२०१६/५२/२०१६ मुंबई, दिनांक :२६/४/२०१६.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम - २००५ अन्वये, आणि शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टीआरएन्-०३११/१३३५/ प्र.क्र.२९९/पोल-५ ब, दि.२९.३.२०११ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपिक संवर्गातील खालील नमूद कार्यालय अधीक्षकांनी त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या सध्याच्या कार्यालयात ३ वर्षे सेवा पूर्ण केल्यामुळे त्यांची बदली करण्यात येत आहे:-

| अ.क्र | कार्यालय अधीक्षकाचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | बदलीवरील नवीन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री.संतोष रतन बागुल | समादेशक, रा.रा.पो.बल, गट, क्र.११ नवी मुंबई | विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद |
| २. | श्रीमती मंगला साहेब काशिद | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर | समादेशक, रा.रा.पो.बल, गट, क्र.११ नवी मुंबई |

२. बदलीच्या आदेशांची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे:-

- बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पर्यायी कार्यालय अधीक्षकांची हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या कार्यालय अधीक्षकांना बदली ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.
- बदली झालेल्या व कार्यमुक्त केलेल्या कार्यालय अधीक्षकांना संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब रुजू करुन घ्यावे. तसेच, ते हजर झाल्याचा दिनांक ह्या कार्यालयास कळवावा. एखाद्या कार्यालय अधीक्षकास रुजू करुन न घेतल्यास सक्तीचा प्रतीक्षाकाळ ठरवून काम न देता भत्ते देण्याचा प्रश्न उद्‌भवल्यास संबंधीत घटक प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल.
- बदलीच्या आदेशांत बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही कार्यालय अधीक्षकाने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे बाह्य दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे कार्यालय अधीक्षक शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.
- बदली झालेल्या कार्यालय अधीक्षकांनी त्यांची पदस्थापना केलेल्या कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे.

३. सदरचे आदेश पोलीस महासंचालकांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**प्रवीण दीक्षित**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत,**

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर /औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद

समादेशक, रा.रा.पो.बल, गट, क्र.११ नवी मुंबई

**प्रत माहितीसाठी:**

अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे.

कार्यासन अधिकारी, का.क्र. १०, १२

**( अर्चना त्यागी )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.